## महाराष्ट्र शासन

**तात्काळ /कालमर्यादा /ई-मेल** क्रमांक : एसएलएस-२०२१/प्र.क्र. ३५/२०२१/आ(वर्ग-२),

E Mail- doesttclass२.wrd@maharashtra.gov.in
दूरध्वनी क्र. ०२२-२२७९४१४५

जलसंपदा विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०६ जुलै ,२०२१.

**प्रति,**

जलसंपदा विभागातील सर्व महासंचालक,
सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग,
जलसंपदा विभागातील सर्व मुख्य अभियंता,
आयुक्त, मृद व जलसंधारण (म.रा.), वाल्मी, औरंगाबाद
अप्पर आयुक्त जलसंधारण, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, पुणे/औरंगाबाद/नागपूर.
अधीक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे.
अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, ठाणे/पुणे/औरंगाबाद/नागपूर/अमरावती.
अधीक्षक अभियंता, कृष्णा पाणी तंटा लवाद, विशेष कक्ष, पुणे.

**विषय :-** दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांच्या पदोन्नतीबाबत.
**संदर्भ-:** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र-दिव्यांग २०१५/प्र.क्र.१७१/१६/१६-अ,
दिनांक ०५ जुलै, २०२१

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दिव्यांगांना राज्य शासकीय सेवेत गट "अ" व गट "ब" मधील पदांवर पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्यासंदर्भात रिट याचिका क्र ६८१९/२०२१ व इतर याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. सदर याचिकांवरील दिनांक २९.०६.२०२१ रोजीचा मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचा न्यायनिर्णय तसेच दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील तरतुदीच्या अनुषंगाने राज्य शासकीय सेवेतील दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांना गट "अ" व गट "ब" मधील पदांवर पदोन्नतीमध्ये आरक्षण विहित करण्यासंदर्भात उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

२. जलसंपदा विभागाच्या नियंत्रणाखालील कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता (स्थापत्य) या निम्न संवर्गातून उपविभागीय अधिकारी (स्थापत्य) संवर्गातील पदोन्नती कोट्यातील रिक्त पदांवरील पदोन्नतीसाठी पात्र अभियंत्यांची सन २०२०-२१ ची निवडसूची तयार करण्याचे शासन स्तरावर प्रस्तावित आहे. त्यानुषंगाने आपल्या अधिपत्याखालील कनिष्ठ अभियंता (शाखा अभियंता) (स्थापत्य) या संवर्गाच्या दिनांक १६.१२.२०१९ व दिनांक १९ ऑगस्ट, २०२० रोजीच्या ज्येष्ठतासूचीतील सेवाज्येष्ठता क्रमांक ८९१८ ते पुढील पदोन्नतीसाठी अर्हतापात्र जे दिव्यांग अधिकारी/कर्मचारी कार्यरत असतील, तथापि ते दिव्यांग असल्याबाबतची नोंद त्यांच्या सेवाज्येष्ठता यादीत अद्याप करण्यात आलेली नाही, अशा प्रकरणी यासोबत

जोडलेल्या विविरणपत्र-अ मधील विविरणपत्रात माहिती भरून, आवश्यक त्या सर्व कागदोपत्री पुराव्यांसह प्रस्ताव दिनांक १४ जुलै, २०२१ पर्यंत शासनास पाठवावा.

३. तसेच विवरणपत्र-अ मधील रकाना क्र. १९ मध्ये दिव्यांगाचा प्रवर्ग नमूद करतेवेळी जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील गट "अ" संवर्गातील उपविभागीय अधिकारी (स्थापत्य) या संवर्गातील पदे शासन निर्णय क्र-दिव्यांग २०१८/प्र.क्र.९९/आ(संनि), दिनांक १८.०२.२०२१ अन्वये अ) कर्णबधीरता अथवा ऐकू येण्यातील दुर्बलता ब) अस्थीव्यंगता/मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy)/ कुष्टरोग मुक्त (Leprocy cured)/ शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism)/ आम्ल हल्लग्रस्त (Acid attack victims)/ स्नायु विकृती (Muscular Dystrophy क) स्वमग्नता (Autism)/ मंदबुद्धी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability)/ विशिष्ठ शिक्षण अक्षमता (Specific Learning Disability) / मानसिक आजार ड) वरील अ ते क मधील बहीरेपणा व अस्थीव्यंगता अशा एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणा-यांसाठी सुनिश्चित करण्यात आली आहेत अशा ४ प्रकारांसाठीच ४% आरक्षण विहित केलेले आहे. त्यानुसारच संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचा दिव्यांग प्रवर्ग नमूद करावा.

४. ज्या कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांनी जलसंधारण विभागामध्ये समावेश करण्याचा विकल्प दिलेला आहे व जलसंधारण विभागाने दि.१८.०९.२०१८ रोजी प्रसिध्द केलेल्या ज्येष्ठता यादीमध्ये त्यांची नावे समाविष्ट आहेत. अशा अभियंता यांचे गोपनीय अहवाल पदोन्नती करीता कार्यालयास पाठविण्यात येवू नयेत.

५. आपल्या अधिनस्त कार्यरत एखाद्या दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांची माहिती उपलब्ध न झाल्यामुळे अभियंते पदोन्नतीपासून वंचित राहिल्यास किंवा भविष्यात न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधित मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता यांची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

६. महासंचालक/मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता यांनी संकलित केलेल्या माहितीची खात्री करावी व तद्नंतरच एकत्रित माहिती शासनास सादर करावी. सदर माहिती सोबत जोडलेल्या विवरणपत्रामध्ये नमूद रकान्याप्रमाणे MS-Excel मध्ये Sakal Marathi या फॉन्टमध्ये माहिती टंकलिखित करुन सॉफ्ट कॉपी व हार्ड कॉपीसह वेळापत्रकाप्रमाणे संबंधित कार्यालयाच्या विशेष अधीक्षक/अधीक्षक/वरिष्ठ लिपिक यांनी व्यक्तिशः माहिती घेऊन यावे. ज्या कार्यालयांची माहिती याप्रमाणे विहित वेळेत प्राप्त होणार नाही, त्यांची माहिती मा. सचिव (लाक्षेवि) यांच्या निदर्शनास आणण्यात येईल.

सदर शासन पत्र हे महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभागाच्या wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्यावरुन या पत्राची प्रत संबंधितांनी काढून घ्यावी व माहिती विहित विवरणपत्रात दिलेल्या वेळेत सादर करावी.

(रणजित शि. अहिरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत:- विवरणपत्र "अ" व
प्रपत्र- "ब".

प्रत:-
कार्यासन आ. (वर्ग-२) संग्रहार्थ.

शासन पत्र क्रमांक : एसएलएस २०२१/प्र.क्र.३५/२०२१/आ.(वर्ग-२) दिनांक : ०६ जुलै, २०२१ चे सहपत्र

## विवरणपत्र- "अ"

### उपविभागीय अधिकारी(स्थापत्य) पदावर दिव्यांग प्रवर्गातून पदोन्नती विचारक्षेत्रात असलेल्या कनिष्ठ अभियंता (शाखा अभियंता) (स्थापत्य) यांचा सेवातपशील

| अ.क्र | ज्येष्ठता क्रमांक | अधिकाऱ्यांचे नाव (मराठीत संपूर्ण नाव द्यावे - आद्याक्षरे देऊ नयेत.) | जन्म दिनांक (दिनांक DD-MM-YYYY या नमुन्यात द्यावा.) | सेवा निवृत्तीचा दिनांक | कनिष्ठ अभियंता पदावरील नियुक्तीचा दिनांक | शैक्षणिक पात्रता | जात प्रवर्ग | जात प्रमाणपत्राची वैधता झाली आहे किंवा कसे | महाराष्ट्रातील मूळ निवासी आहेत किंवा कसे, (सेवापुस्तका- वरुन मूळ गाव तपासावे) | मलोआ ची व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण आहेत किंवा कसे | व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण आहेत काय, असल्यास दिनांक | स्थायित्व प्रमाणपत्र निर्गमित केल्याचा क्रमांक व दिनांक | संगणक परीक्षा उत्तीर्ण आहे काय? असल्यास दिनांक / सुट दिली असल्यास त्याचा दिनांक | विभागीय चौकशी चालू/ प्रस्तावित आहे किंवा कसे ? असल्यास दोषारोप पत्राची प्रत उपलब्ध करुन द्यावी. | सदर अधिकाऱ्याचे ५०/५५ वर्षाचे पुनर्विलोकन झाले आहे काय ? | सन २०१५-१६ ते २०१९-२० या कालावधीच्या गोपनीय अहवालातील प्रतिकूल शेरे कळविण्यात आले आहेत काय, असल्यास त्याची प्रत द्यावी. | दिनांक ३१ मार्च, २०२० अखेरचे मत्ता व दायित्व प्रमाणपत्र सादर केले आहे किंवा कसे? | दिव्यांगत्वाचा प्रकार (अ/ब/क/ड) **** | दिव्यांग प्रमाणपत्र देणारे सक्षम प्राधिकारी /प्रमाणपत्राचा दिनांक/ प्रमाणपत्र साक्षांकित करुन सादर करणे | अधिकाऱ्याचा जोडीदार किंवा त्यांचे मूल मतिमंद आहे का? असल्यास त्याबाबतचा पुरावा सादर करावा. | स्त्री अधिकारी असल्यास विधवा किंवा परित्यक्त्या आहेत किंवा कसे? असल्यास त्याबाबतचा पुरावा सादर करावा. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

महत्त्वाची टिप :-

(१) सन २०१५-१६ ते २०१९-२० या कालावधीतील मूळ गोपनीय अहवाल पाठवावेत. मूळ गोपनीय अहवाल उपलब्ध नसतील तर दुय्यम गोपनीय अहवाल पाठवावेत. अर्धवट गोपनीय अहवाल पाठवू नयेत. मागणी केलेल्या वर्षाव्यतिरिक्त जादा गोपनीय अहवाल पाठवू नयेत. प्रत्येक गोपनीय अहवालाच्या मुखपृष्ठावर संबंधित कार्यालयाचे नाव व ज्येष्ठता क्रमांक नमूद करावा.

(२) मागास प्रवर्गातील अधिकाऱ्यांचे मूळ जात प्रमाणपत्र व मूळ जात वैधता प्रमाणपत्राची प्रत्येकी एक जादा छायांकित प्रत प्रमाणित करुन पाठवावी. तसेच सेवापुस्तकाच्या पहिल्या पानाची व जात वैधतेबाबतची नोंद असलेल्या पानाची छायांकित प्रत प्रमाणित करुन पाठवावी.

(३) कनिष्ठ अभियंता संवर्गाच्या अंतिमरित्या प्रसिध्द करण्यात आलेल्या ज्येष्ठता यादीतील नोंद व कार्यालयांतर्गत कार्यरत अधिकाऱ्यांचे नांव, जात प्रवर्ग व इतर तपशिल यात काही फरक असल्यास त्याबाबतचा स्पष्ट उल्लेख माहितीमध्ये करावा.

(४) मृद व जलसंधारण विभागाकडे समावेश होण्याचा विकल्प दिलेल्या अभियंत्यांची माहिती पाठविण्यात येऊ नये.

(५) ****दिव्यांगत्वाचा प्रकार निश्चित करतेवेळी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक-दिव्यांग २०१५/प्र.क्र.१७१/१६-अ, दिनांक ०५.०७.२०२१ मधील तरतुदी गृहित धरण्यात याव्यात.

प्रपत्र -"ब"

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, शासन पत्र क्रमांक एसएलएस २०२१/प्र.क्र. ३५/२१/आ(वर्ग-२), दिनांक ०६ जुलै, २०२१ अन्वये या कार्यालयांतर्गत कार्यरत सर्व कनिष्ठ अभियंता (शाखा अभियंता) (स्थापत्य) या संवर्गातील दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांची दिनांक १६.१२.२०१९ व दिनांक १९ ऑगस्ट, २०२० रोजीच्या ज्येष्ठतासूचीतील सेवाज्येष्ठता क्रमांक ८९१८ ते पुढील पदोन्नतीसाठी अर्हतापात्र अभियंत्यांची माहिती सोबत पत्र क्रमांक ..................................................., दिनांक --/---/२०२१ अन्वये सादर करण्यात आली आहे. हे दिव्यांग अभियंते वगळता अन्य कोणताही दिव्यांग कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता (स्थापत्य) या प्रदेश कार्यालयांतर्गत कार्यरत नाही.

तसेच सोबतच्या अभियंत्याची माहिती कार्यालयीन सेवा अभिलेखावरुन तपासली असून ती अचूक व योग्य आहे.

नाव -:सही/

स्थळ-:

दिनांक -: